रागांवैम / छशिमरु/ अधि.४२२
अधिष्ठाता यांचे कार्यालय,
रागांवैम व छशिमरु,कळवा,
दिनांक :- १२/०८/२०२४

## जाहीरात

**विषय** :-राजीव गांधी वैद्यकीय महाविद्यालयाच्या आस्थापनेवरील रिक्त **प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक** यांची (**१७९** दिवसांकरिता) तात्पुरत्या स्वरुपात, एकत्रित वेतनावर नियुक्ती करणेबाबत.

**संदर्भ :-**

१.वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय क्र. एलईसी—२०२१/प्र.क्र१९९/वैसेवा -३, दिनांक ९/०२/२०२२

२. The Gazette of India, CG-DL-E-१७०८२०२३-२४८१५४ EXTRA ORDINARY PART-III SECTION ४ NMC. NEW DELHI, DT: १६/०८/२०२३ (MSR).

३. मा.आयुक्त सो. यांची दिनांक २२/०७/२०२४ ची मान्यता.

राजीव गांधी वैद्यकीय महाविद्यालयाच्या आस्थापनेवरील प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक या पदावर १७९ दिवसांकरिता तात्पुरत्या स्वरुपात करार पद्धतीने नियुक्तीसाठी राष्ट्रीय आर्युविज्ञान परिषद, नवी दिल्ली यांनी विहित केलेली आवश्यक अर्हता धारण करणारे खाजगी व अन्य क्षेत्रातील उमेदवारांना तसेच त्या त्या पदावरुन सेवानिवृत्त झालेल्या वयाच्या ६९ वर्ष वयोगटाच्या आतील उमेदवारांना करार पद्धतीने नियुक्ती देण्यासाठी खालील प्रमाणे जाहिरात देण्यात येत आहे.

सदर पदाकरीता २०/०८/२०२४ रोजी सकाळी १० ते दुपारी १ पर्यंत थेट मुलाखत आयोजित करण्यात येत आहे. अर्हता प्राप्त उमेदवारांनी दिनांक २०/०८/२०२४ रोजी सकाळी ९ ते १० या वेळेत मा. अधिष्ठाता रागांवैम व छशिमरु, कळवा, ठाणे यांचे नावे सर्व कगदपत्रा सह साक्षांकित अर्ज अधिष्ठाता कार्यालयात सादर करावा.

**एकूण रिक्त पदे व प्रति महिना एकत्रित वेतन :**

| **अक्र** | **पदाचे नाव** | **रिक्त पदे** | **शैक्षणिक पात्रता आणि अनुभव** | **प्रति महिना एकत्रित वेतन** |
|---|---|---|---|---|
| १ | प्राध्यापक | ०४ | एन.एम.सी., नवी दिल्ली यांचे मानकानुसार | १)१,८५,०००/ (बिगर सेवानिवृत्त)<br>२) शा. नि १७.१२.२०१६ तरतुदीनुसार (सेवानिवृत्त ) |
| २ | सहयोगी प्राध्यापक | ११ | एन.एम.सी., नवी दिल्ली यांचे मानकानुसार | १)१,७०,०००/ (बिगर सेवानिवृत्त)<br>२) शा. नि १७.१२.२०१६ तरतुदीनुसार (सेवानिवृत्त ) |
| | एकुण | १५ | | |

विभाग निहाय  रिक्त पदे पुढील प्रमाणे :-

**प्राध्यापक :एकूण पदे ०४**

| अनु.क्र | विभाग | पदसंख्या |
|---|---|---|
| १ | बायोकेमिस्ट्री | १ |
| २ | फार्माकोलॉजी | १ |
| ३ | टीबी /चेस्ट | १ |
| ४ | सायकॅट्री | १ |
| | **एकूण पदे** | **०४** |

**सहयोगी प्राध्यापक :एकूण पदे ११**

| अनु.क्र | विभाग | पदसंख्या |
|---|---|---|
| १ | फिजीओलॉजी | १ |
| २ | जनरलमेडीसीन | १ |
| ३ | टीबी /चेस्ट | १ |
| ४ | सर्जरी | १ |
| ५ | ऑथोपॅडीक | २ |
| ६ | ओ. बी. जी . वाय | १ |
| ७ | रेडीओलॉजी | १ |
| ८ | ॲनेस्थेशिया | २ |
| ९ | दंतचिकित्सा | १ |
| | **एकूण पदे** | **११** |

उपरोक्त विषयानुसार " प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक " संवर्गातील एकुण **१५** कंत्राटी पदे **१७९** दिवसाच्या कालावधी करीता) भरतीसाठी अनुशेष / आरक्षण खालीलप्रमाणे आहे.

| **अनु.क्र.** | **प्रवर्ग** | **प्राध्यापक** | **सहयोगी प्राध्यापक** |
|---|---|---|---|
| १ | खुला | १ | ३ |
| २ | अनुसुचित जाती | १ | १ |
| ३ | अनुसुचित जमाती | - | १ |
| ४ | विमुक्त जाती (अ) | १ | १ |
| ५ | भटक्या जमाती (ब) | - | १ |
| ६ | भटक्या जमाती (क) | - | - |
| ७ | भटक्या जमाती (ड) | - | - |
| ८ | विशेषमागास प्रवर्ग | - | - |
| ९ | इतर मागास प्रवर्ग | १ | २ |

| | | | |
|---|---|---|---|
| १० | साशैमाप्र | - | १ |
| ११ | आदुघ | - | १ |
| | एकूण | ०४ | ११ |

**अटीशर्ती :-**

१. उमेदवार भारताचा नागरिक व महाराष्ट्रातील रहीवासी असावा.

२. नियुक्तीच्या वेळेस उमेदवाराचे वय ६९ वर्षापेक्षा जास्त नसावे.

३. प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक पदावर करार पदधतीने नियुक्तीसाठी त्या त्या पदावरुन सेवानिवृत्त् झालेल्या अध्यापका बरोबरच राष्ट्रीय आयुर्विज्ञान परिषद, नवी दिल्ली यांनी विहित केलेली आवश्यक अर्हता धारण करणारे खाजगी व अन्य क्षेत्रातील उमेदवार (बिगर सेवानिवृत्त) पात्र असतील.

४.करार पद्धतीने नियुक्तीचा कालावधी हा नियमित उमेदवार उपलब्ध होईपर्यंत अथवा **१७९** दिवसांचा कालावधी यापैकी जे अगोदर घडेल इतका राहील तथापि सदरहू पदावर नियमित उमेदवार उपलब्ध झाल्यास कंत्राटी उमेदवाराच्या पदस्थापनेत बदल करून देण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना राहतील.

५. उमेदवाराचे कामकाज समाधानकारक नसल्यास गंभीर स्वरूपाची अनियमितता व गैरवर्तणूक या कारणासाठी त्याची नियुक्ती कोणत्याही पूर्व सूचने शिवाय संपुष्टात येईल.

६. करार पद्धतीने नियुक्त उमेदवाराने प्रस्थापित मानकानुसार अध्यापन रुग्णसेवा व अधिष्ठाता यांनी नेमून दिलेली विवक्षित कामे पार पाडणे आवश्यक राहील.

७. वरील प्रमाणे विहित कामकाज पार पाडल्यानंतर महाविद्यालयीन व रुग्णालयीन कर्तव्य व जबाबदाऱ्यांवर विपरीत परिणाम होणार नाही याची दक्षता घेऊन उमेदवारास खाजगी वैद्यकीय व्यवसाय करण्याची मुभाराहील.

८. करार पद्धतीने नियुक्त उमेदवारांना नियमित नियुक्तीसाठी कोणताही हक्क राहणार नाही, तसेच सदर कालावधी कोणत्याही सेवा प्रयोजनासाठी ग्राह्य धरला जाणार नाही.

९. करार पद्धतीने नियुक्त उमेदवारास त्याच्या सेवा कालावधीत केवळ नैमित्तिक रजा अनुज्ञेय असतील.

१०. करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांना प्राप्त होणाऱ्या कागदपत्रे किंवा माहिती आधार सामग्रीबाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहील.

११. करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींना कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार प्रदान करता येणार नाहीत.

१२. उमेदवारास नियुक्ती देण्यात आल्यानंतर किमान एक शैक्षणिक सत्र संपेपर्यंत त्यास कोणत्याही परिस्थितीत सेवा सोडता येणार नाही. तशा आशयाचे शपथ पत्र उमेदवारास नियुक्तीपूर्वी सादर करणे बंधनकारक असेल. असे शपथपत्र सादर करणाऱ्या उमेदवारासच करार पद्धतीने नियुक्ती देण्यात येईल. शैक्षणिक सत्र चालू असलेल्या कालावधीत विद्यार्थी हित विचारात घेता उमेदवाराचा राजीनामा कोणत्याही परिस्थितीत स्वीकारला जाणार नाही.

१३. बिगर सेवानिवृत्त गटातून करार पद्धतीने नियुक्त होणाऱ्या अध्यापकाची नंतरच्या काळात नियुक्ती झाल्यास त्याला पूर्वीच्या सेवेचे कोणतेही लाभ अनुज्ञेय असणार नाहीत.

१४. अर्जदाराने संबंधित पदासाठी शारीरिक दृष्ट्या पात्र असल्याचे वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करावे.

१५. अर्जदाराने त्यांच्या निवडीसाठी समितीवर प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल.

१६. अर्जदाराचे नाव महाराष्ट्र वैद्यकीय मंडळ अधिनियम १९६५ च्या अंतर्गत कायम नोंदणी केल्याबाबतचे प्रमाणपत्र किंवा भारतीय वैद्यकीय परिषदेचे कायम नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

१७.उमेदवारांना मुलाखतीसाठी स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल.

१८. मुलाखतीला येताना उमेदवारांनी सादर केलेल्या सर्व दस्तऐवजांचे मूळ कागदपत्र सोबत आणणे बंधनकारक राहील.

१९. **सदर जाहिराती मधील नमूद पदसंख्येत बदल करणे किंवा सदरची जाहिरात पूर्णतः रद्द करण्याचा अधिकार मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे, यांचे मान्यतेने अधिष्ठाता यांनी स्वतःकडे राखून ठेवला आहे.**

Sd/-
(डॉ. राकेश बारोट)
अधिष्ठाता,
रा.गां.वै.म.वछ.शि.म.रु.,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.